**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.मौलासाब जमालसाब सगरी
८५/४, रविवार पेठ,
सोलापूर

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) कार्यालय,**
जुनी पी.एम.टी. बिल्डिंग, स्वारगेट, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी तथा विभागीय वन अधिकारी (नियोजन),**
मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) कार्यालय,
जुनी पी.एम.टी. बिल्डिंग, स्वारगेट, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३३०/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २२/०९/२००८ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३०/१०/२००८ |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** शासनाच्या महसूल व वन विभागाच्या दि.४/०३/२००८ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने आरा गिरणी परवाना नूतनीकरणासंदर्भात अभिप्राय पाठविण्यात आले आहेत काय, याबाबतचा खुलासा | |

**विवेचन**

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.४/०४/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. सदर कार्यक्रमास अपीलकर्ता श्री. मौलासाब जमालसाब सगरी हे अनुपस्थित होते. अपीलकर्त्यास त्यांच्या मागणीनुसार मुदतीत माहिती देण्यात आली असल्याचे जन माहिती अधिकारी तथा विभागीय वन अधिकारी (नियोजन), मुख्य

वनसंरक्षक (प्रादेशिक) कार्यालय, पुणे, श्री. जी. डी. वळसे व अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य वनसंरक्षक, पुणे श्री. शिरीष आस्थाना यांनी प्रपत्रात नमूद करुन त्याबाबतची पोहोच सोबत जोडली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 27 APR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्रीमती रंजना सावळा पांढरे
मु.पिसेवाडी, पो.वेळापूर,
ता.माळशिरस, जि.सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक,**
सोलापूर ग्रामीण,
सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,**
अकलूज विभाग, ता.माळशिरस,
जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३४४/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ९/०९/२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ७/११/२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १०/११/२००८ |
| ५ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** दिनांक २३/०४/२००८ व २५/०४/२००७ रोजी गुन्हा रजिस्टर नं. १८९/०७ च्या संदर्भात घेण्यात आलेल्या जाबजबाबाच्या नकला | |

**विवेचन**

अपीलकर्त्या श्रीमती रंजना सावळा पांढरे यांनी राज्य माहिती आयोगाकडे सादर केलेल्या कागदपत्रांवरुन त्यांना जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, अकलूज विभाग, ता.माळशिरस, यांनी दिनांक ७/१०/२००८ व ७/११/२००८ रोजीच्या पत्रान्वये माहिती दिली असल्याचे दिसून येते.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**

**दि :-** 27 APR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. गौतम उत्तम चव्हाण
रा.टेंभुर्णी, ता.माढा,
जि.सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा सचिव,**
सहसंकल्प शिक्षण प्रसारक मंडळ,
८५, नालंदा नगर विजापूर रोड,
सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
सहसंकल्प शिक्षण प्रसारक मंडळ,
८५, नालंदा नगर विजापूर रोड,
सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३५६/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २२/१०/२००८ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २१/११/२००८ |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** सहसंकल्प शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेच्या स्थापनेपासून ते दि.३/११/२००८ अखेरपर्यन्तच्या सर्व माहितीचे एकूण २५ मुद्दे | |

**<u>विवेचन</u>**

विनाअनुदानित खाजगी शिक्षण संस्थांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्र.५१३२/२००८ मध्ये दिला आहे. राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.४/४/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत

कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. सहसंकल्प शिक्षण प्रसारक मंडळ, सोलापूर या संस्थेस कोणतेही शासकीय अनुदान मिळत नसल्याची बाब जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी तथा सचिव, सहसंकल्प शिक्षण प्रसारक मंडळ, सोलापूर यांनी प्रपत्रात नमूद केली आहे. सबब सदरचे अपील दखलयोग्य ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 26 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. अनंतकुमार बाहुबली रणदिवे
५६, राणाप्रतापनगर, विजापूर रोड,
सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य.),**
जिल्हा परिषद सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,**
श्री नूतन प्रशाला, जयकुमारनगर, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३७१/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २९/०८/२००८, ४/१०/२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १९/०१/२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १४/११/२००८ |
| ५ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-**<br>१) श्री एस. एन. शहापूरे यांना ज्या नियमानुसार वेतन श्रेणी देण्यात आली आहे त्या शासन निर्णयाची प्रत व श्री.ए.डी.पाटील यांच्या बी.एड. च्या गुणपत्रकाची छायाप्रत<br>२) प्रशालेतील श्री. ए.डी.पाटील यांच्या कार्यभार पत्रकाची प्रत, पर्यावरण विषय शिकवणाऱ्या शिक्षकांच्या कार्यभाराची प्रत व अर्जदाराने घेतलेल्या वैद्यकिय व अर्जीत रजेच्या अर्जांच्या छायाप्रती<br>३) श्री नूतन प्रशाला, जयकुमारनगर, सोलापूरच्या सन २००१ -०२, २००२-०३, व सन २००७ -०८ या वर्षाच्या मान्य सेवक संचाच्या छायाप्रती | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री अनंतकुमार बाहुबली रणदिवे यांनी राज्य माहिती आयोगाकडे एकापेक्षा अधिक माहिती - मागणी अर्जांसाठी एकत्रित अपील केले आहे. प्रत्येक अर्जासाठी आयोगाकडे स्वतंत्र अपील करणे आवश्यक आहे. तरीही राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.१६/०४/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. 'अपीलकर्त्यास त्यांच्या मागणीनुसार कार्यालयात उपलब्ध असणारी सर्व माहिती दिलेली आहे व उपलब्ध नसणाऱ्या माहितीविषयी त्यांना कळविण्यात आले आहे असे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री नूतन प्रशाला जयकुमारनगर, सोलापूर यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. तसेच दिनांक १२/०१/२०१० च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले आहे

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- 27 APR 2010**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१.

श्री. हाजी महंमद फारुक निसार अहमद शेख
५२६, न्यू पाच्छा पेठ, सोलापूर

**अपीलकर्ता**

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी तथा सहायक आयुक्त (स.),**
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता,**
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३७३/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २६/०५/२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १३/०६/२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ८/०७/२००८ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २५/०७/२००८ |
| ६ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी** :- नगर अभियंता, सोलापूर महानगरपालिका यांचे हजेरी पुस्तक, रजेचा तपशील, रजा कालावधीतील पदभार संभाळणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव, तसेच महानगरपालिका हद्दीत बांधकाम करण्यास परवानगी मिळणेसंदर्भातील माहिती असे एकूण ६ मुद्दे | |

<u>विवेचन</u>

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.१६/०४/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. सदर कार्यक्रमास अपीलकर्ता श्री. हाजी महंमद फारुक निसार अहमद शेख हे अनुपस्थित होते. 'अपीलकर्त्यास त्यांच्या मागणीनुसार संपूर्ण माहिती वेळेत दिलेली आहे. अपीलकर्त्यास अजूनही काही माहिती हवी असल्यास ती देण्यास तयार

आहोत', असे जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता यांचे प्रतिनिधी श्री. सी.के.पाणीभाते, कार्यालयीन अधिक्षक, सोलापूर महानगरपालिका यांनी प्रपत्रात नमूद केलेले आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 26 APR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. दत्तू सोपान थिटे
मु.पिरटाकळी, पो.ति-हे,
ता.मोहोळ, जि.सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता व प्रशासक,**
लाभक्षेत्र विकास प्राधीकरण, सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
भिमा विकास विभाग क्र.२,
सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३७४/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३१/१०/२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ११/११/२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३१/१२/२००८ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १३/०१/२००९ |
| ६ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** अमृतधारा पाणीवापर सहकारी संस्था पिरटाकळीचे सदस्य श्री. दत्तू सोपान थिटे यांच्या सभासदत्वाचा कागदोपत्री पुरावा तसेच उजनीधरणाच्या पाण्याचा लाभ शेतकऱ्यांना केंव्हापासून मिळाला तदनुषंगीक एकूण ५ मुद्दे | |

**विवेचन**

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.४/०४/२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' त सदर अपिलाचा समावेश करण्यात आला होता. ' अपीलकर्त्याने मूळ माहिती - मागणी अर्जापेक्षा अपिलामध्ये वेगळी माहिती देण्याची मागणी केलेली आहे. सदरची माहिती देखील शुल्क

भरुन घेऊन जाण्याबाबत अपीलकर्त्यास कळविण्यात आले आहे. तथापि अपीलकर्त्याने कार्यालयाशी संपर्क केलेला नाही', असे जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, भिमा विकास विभाग क्र.२, सोलापूर श्री. शी.ना .बोलभट्ट यांनी प्रपत्रात नमूद केले आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**पुणे.**
**दि :-** 26 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.जुगल श्रीनिवासजी राठी
डी-३, कंचनबन सोसायटी, सेनापती बापट मार्ग, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस उपआयुक्त, प्रशासन व
माहिती अधिकारी, पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, प्रशासन व
माहिती अधिकारी, पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४३९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२३.२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.जुगल श्रीनिवासजी राठी
डी-३, कंचनबन सोसायटी, सेनापती बापट मार्ग, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, प्रशासन व
माहिती अधिकारी, पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर, पुणे श्री.एस.आर.चौगुले

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२३.८.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.६.१०.२००७ व १६.११.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१२.१०.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | आदेश नाही |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२१.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी संबंधितांपैकी कोणीही हजर न राहिल्यामुळे पुन्हा दि.२६.११.२००८ रोजी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश केला गेला. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.२३.२.२०१० रोजी घेण्यात आली.

आपण दि.२२.८.२००७ रोजी मागितलेली माहिती दि.११.१२.२००७ रोजी व तीही अपुरी मिळाली. डॉ.पसरिचा-ख्वाजा युनूस खटला का प्रलंबित आहे, या अनुषंगाने मागितलेली माहिती मिळाली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.जुगल श्रीनिवासजी राठी यांनी केली.

श्री.राठी यांनी दि.१.४.२००४ ते ३१.८.२००७ या काळातील माहिती मागितली होती. बारा सहाय्यक माहिती अधिकाऱ्यांकडून ही माहिती मिळवावयाची होती. तसेच विभागीय चौकशी शाखा व गुन्हे शाखा यांच्याकडूनही ही माहिती सादर करण्याचे लेखी आदेश दिले होते. विभागीय चौकशी शाखेकडून माहिती न मिळाल्यामुळे व विहित मुदत लक्षात घेऊन १५ दिवसांची अतिरिक्त मुदत मागणारे विनंतीपत्र श्री.राठी यांना पाठविले. तसेच माहितीबाबत कोणत्या पदाच्या अधिकाऱ्याची माहिती आदीच्या नेमकेपणाबाबत श्री.राठी यांच्याशी संपर्क साधून विचारणा केली. सहाय्यक माहिती अधिकाऱ्यांकडून प्राप्त झालेली माहिती दि.११.१२.२००७ रोजी व दि.२६.११.२००८ रोजी देण्यात आली. दोषारोपासाठी परवानगीबाबत सादर केलेल्या प्रकरणांचा तपशील वरिष्ठांनी निर्णय दिल्याशिवाय देता येत नाही, असे विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, प्रशासन व माहिती अधिकारी, पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर, पुणे श्री.एस.आर.चौगुले यांनी नमूद केले.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, प्रशासन व माहिती अधिकारी, पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर, पुणे यांनी श्री.राठी यांच्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आठ दिवसात आयोगाला सादर करावा, तसेच शास्तीबाबतचे म्हणणेही लेखी द्यावे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, प्रशासन व माहिती अधिकारी, पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर, पुणे श्री.एस.जी.सोनावणे यांनी दि.२.३.२०१० च्या पत्रान्वये अहवाल सादर केला. पोलीस आयुक्तालयाच्या अखत्यारीतील (सर्व विभागीय सहाय्यक पोलीस अधिकारी), सहाय्यक माहिती अधिकारी, विभागीय चौकशी शाखा व सहाय्यक जन माहिती अधिकारी, विभागीय चौकशी, गुन्हे शाखा यांना माहितीबाबत पाठविलेली पत्रे व त्यांची उत्तरे, मुदतवाढीसाठी व माहितीच्या नेमकेपणाबाबत श्री.राठी यांना पाठविलेली पत्रे यांच्या प्रती श्री.सोनावणे यांनी अहवालासोबत सादर केल्या. विभागीय चौकशी शाखेकडून प्राप्त झालेली माहिती अयोग्य व अपुरी वाटल्यामुळे आपण अधिक माहिती घेतली व पोलीस आयुक्तालयाकडून महाराष्ट्र शासनाकडे पत्रव्यवहार करणाऱ्या पीसीबी शाखेकडून अधिक माहिती मिळविण्यासाठी या शाखेच्या पोलीस निरीक्षकांना पत्र पाठविले, असे श्री.सोनावणे यांनी तपशीलवार नमूद केले असून आपल्याकडील कार्यभार व योग्य माहिती देण्याबाबत आपण केलेले प्रयत्न याचा तपशील सादर केला आहे. तो लक्षात घेता माहिती संकलित करून देण्याचा प्रयत्न त्यांनी केल्याचे दिसते. आपल्या कक्षेबाहेरील व ग्रामीण पोलिसांच्या कक्षेतील माहितीही मिळवून देण्याचा प्रयत्न आपण केल्याचे श्री.सोनावणे यांनी नमूद केले.

वरील बाबी लक्षात घेता तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, प्रशासन व माहिती अधिकारी, पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर, पुणे यांचा विलंबाबाबतचा खुलासा मान्य करण्यात येत आहे. अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उपआयुक्त, प्रशासन व माहिती अधिकारी, पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर पुणे यांनी अपिलाची सुनावणी घेऊन अथवा उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांचा विचार करून माहितीचा अधिकार अधिनियम,

२००५ अंतर्गत विहित केलेल्या मुदतीत अपिलाचा निर्णय देणे आवश्यक आहे, याची समज तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उपआयुक्त, प्रशासन व माहिती अधिकारी, पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर, पुणे श्री.एस.जी.सोनावणे यांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२८.४.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.चंद्रकांत देवराम कांबळे
सहायक सरकारी अभियोक्ता,
मिरज लोहमार्ग न्यायालय, मिरज **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** अपर पोलीस अधीक्षक,
पुणे लोहमार्ग पोलीस कार्यालय, पुणे **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय),
पुणे लोहमार्ग पोलीस कार्यालय, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४८५/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२३.०३.२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br>**अपिलीय प्राधिकारी तथा** अपर पोलीस अधीक्षक,<br>पुणे लोहमार्ग पोलीस कार्यालय, पुणे डॉ.डी.पी.प्रधान<br><br>**जन माहिती अधिकारी तथा** पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय),<br>पुणे लोहमार्ग पोलीस कार्यालय, पुणे श्री.अ.सु.काझी | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२२.०७.२००७ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२१.०८.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२९.०८.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.- |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

# विवेचन

आपण केलेल्या आठ अर्जांवरील कार्यवाही व चार महिन्यांचे न दिलेले वेतन याबाबत माहिती दिली जात नाही. तसेच वेतन ओळखपत्र, ड्यूटी पास पोलिस अधिकारी देत नाहीत. अशी तक्रार अपीलकर्ता श्री.चंद्रकांत देवराम कांबळे यांनी राज्य माहिती आयोगाकडील माहिती अर्जात केली आहे.

अपीलकर्ता श्री.कांबळे हे सहाय्यक सरकारी अभियोक्ता आहेत. माहितीसाठी शुल्क भरण्याचे पत्र त्यांना विहित मुदतीत पाठविले. प्रत्यक्ष पत्र देण्यासाठी कर्मचारी पाठविला. परंतु त्यांनी दिलेल्या पत्त्यावर ते नसल्याचे आढळले. तसा वेळोवेळी केलेला पत्रव्यवहार व संबंधित कर्मचाऱ्यांचे जबाब यांची नोंद आहे. त्यांनी शुल्क भरले नाही. तसेच समक्षही आले नाहीत. त्यामुळे त्यांच्या वेतन व भत्त्याच्या संदर्भात पोलिस महासंचालक, महराष्ट्र राज्य व सरकारी अभियोग संचालक, महाराष्ट्र राज्य आदींना कळविले, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय),पुणे लोहमार्ग पोलीस कार्यालय, पुणे श्री.अ.सु.काझी यांनी पूरक कागदपत्रांसह केले. हे लक्षात घेता माहिती न मिळाल्याची अपीलकर्त्याची तक्रार अवाजवी आहे. अपीलकर्त्याच्या अन्य मागण्या माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

स्थळ : पुणे
दि. 30 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

१. श्री. बापुराव मारूती देवकाते
२. श्री. पोपट साहेबराव देवकाते — अपीलकर्ता
रा. निरावगज, ता. बारामती, जि. पुणे

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,
ता. बारामती, जि. पुणे — उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा सचीव,
श्री. वाघेश्वर विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या.,
निरावगज, ता. बारामती, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५ / २०१० / पुणे<br>१८८२ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | ८.४.२०१० व २७.४.२०१० |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** - १. श्री. बापुराव मारूती देवकाते
२. श्री. पोपट साहेबराव देवकाते
रा. निरावगज, ता. बारामती, जि. पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,
ता. बारामती, जि. पुणे श्री. संजय आ. गाडेपाटील

**जन माहिती अधिकारी** तथा सचीव,
श्री. वाघेश्वर विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या.,
निरावगज, ता. बारामती, जि. पुणे श्री. बापुराव मारुतराव देवकाते

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१.७.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १.९.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३.१०.२००९ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

कर्जमाफी व बंधपत्र या संदर्भात आपण मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा सचीव, श्री वाघेश्वर विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या., निरावगज, ता. बारामती, जि. पुणे यांनी दिली नाही. तसेच काही सभासदांचे दाखले आपण मागितले होते ते दिले नाहीत. सोसायटीने कर्जमाफीची रक्कम दडविली असून कागदपत्रात फेरफार केले आहेत, अशी तक्रार अपीलकर्ता (अपील क्र.१८८२) श्री. पोपट साहेबराव देवकाते यांनी केली.

अपील क्र. १८८२ मधील अपीलकर्ता यांनी विस्तृत स्वरुपाची व अन्य व्यक्तींच्या खात्यासंदर्भातील माहिती मागितली होती. तसेच भागदाखला देण्याची मागणी माहितीच्या अधिकारात येत नाही. तरीही माहिती देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, बारामती, जि. पुणे यांनी दिले, ते आदेश रद्दबातल ठरवावेत, अशी मागणी संस्थेचे जन माहिती अधिकारी तथा सचीव श्री. वाघेश्वर विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या., श्री. बापुराव मारुतराव देवकाते यांनी अपील क्र. १५/पुणे मध्ये केली.

सर्व माहिती देण्याची व अभिलेख दाखविण्याची तयारी आपण दर्शविली होती. परंतु माहितीपेक्षा राजकीय हेतूने त्रास देण्याचा अपीलकर्ता श्री. पोपट साहेबराव देवकाते यांचा उद्देश असून त्यांच्याविरूध्द आपण पोलिसांमध्ये तक्रार दाखल केलेली आहे, असे श्री. बापूराव मारुती देवकाते, सचीव, श्री वाघेश्वर विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या., निरावगज, ता. बारामती, यांनी लेखी व तोंडी नमूद केले. तसेच श्री. पोपट साहेबराव देवकाते विविध स्वरूपाचे अर्ज सातत्याने करीत असतात, दमदाटी करतात, दिलेली कोणतीही माहिती स्वीकारीत नाहीत, शुल्क भरत नाहीत, असेही प्रतिपादन त्यांनी केले.

श्री. पोपट साहेबराव देवकाते यांनी कळविलेले शुल्क भरले नाही व आपल्याकडे अपील केले. त्यांच्या १४ पैकी ६ मुद्दयांची माहिती देण्याचे आदेश आपण दिले होते, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, बारामती, जि. पुणे श्री. संजय आ. गाडेपाटील यांनी केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता संस्थेने माहिती देण्याची तयारी दर्शविली आहे व श्री. पोपट साहेबराव देवकाते यांनी त्रयस्थ पक्षाच्या संदर्भातील खाते उतारा, भाग दाखला आदींची मागणी केली आहे, असे दिसते. दाखला तयार करुन देण्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. तसेच अन्य व्यक्तींचे खातेउतारे आदींबाबतची माहिती नाकारण्याचा संस्थेच्या सचिवांचा निर्णय योग्य आहे. मुद्दा क्र. १,२,३,७,११ (या मुद्दयातील फक्त शेअर्सबाबतची माहिती ), मुद्दा क्र. ५, १३ व १४ (या मुद्दयांच्या कर्जमाफीची सध्याची यादी) माहिती संस्थेच्या सचीवांनी श्री. पोपट साहेबराव देवकाते यांना रजिस्टर्ड टपालाने पाठवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

सातत्याने विविध स्वरुपाची माहिती मागणे, देऊ केलेली माहिती न स्वीकारणे, शुल्क न भरणे व माहिती दिली जात नसल्याची तक्रार / अपिले करणे ही अपीलकर्त्यांची कृती त्यांच्या भूमिकेबद्दल साशंकता निर्माण करणारी आहे, त्याबाबत श्री. पोपट साहेबराव देवकाते यांना समज देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दि. 29 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.संजय मदन वेदपाठक
प्लॉट क्र.३, सी.टी.एस.१३७, संतोष सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.,
तळजाई पठार, धनकवडीजवळ, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर (१), गुलटेकडी, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५०३ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२७.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे डॉ.केदारी जाधव

**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर (१), गुलटेकडी, पुणे श्री.विनायक कोकरे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१५.५.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१२.६.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१९.६.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१४.७.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.संजय मदन वेदपाठक यांनी संतोष सहकारी गृहरचना संस्था मर्या., सर्वे नं.४, तळजाई पठार, धनकवडीजवळ, पुणे या संस्थेच्या संदर्भातील तक्रारविषयक कार्यवाहीची माहिती खुलासेवजा व प्रश्नांच्या स्वरूपात मागितली होती. संस्थेवर प्रशासक नियुक्त करण्यात आले असून त्यांना मुदतवाढ देण्यात आल्याचे अपीलकर्त्यास कळविले. दिलेली माहिती त्रोटक स्वरुपाची असल्याचे नमूद करून सर्व मुद्दयांची देय माहिती आठ दिवसांत देण्याचा आदेश अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे श्री.सुनिल देशमुख यांनी दिला, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर(१), गुलटेकडी, पुणे श्री.विनायक कोकरे व अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे डॉ.केदारी जाधव यांनी केले. अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे यांचा निर्णय योग्य असून मूळ अर्जातील प्रश्नांच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीची माहिती अपीलकर्त्यास दिली जाणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील मान्य करण्यात येत आहे.

(२) अपीलकर्त्यास संतोष सहकारी गृहरचना संस्था मर्या., सर्वे नं.४ तळजाई पठार, धनकवडीजवळ, पुणे या संस्थेबाबत मूळ अर्जानुसार मुद्देनिहाय माहिती जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर(१), गुलटेकडी, पुणे यांनी एका आठवड्यात द्यावी व त्याचा अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
29 APR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.उदय सदाशिवराव कुलकर्णी
२९/३४, फ्लॅट नं.४०१, साईप्रसाद, चैतन्यनगर, धनकवडी, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर (१), गुलटेकडी, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५०४ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२७.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे डॉ.केदारी जाधव

**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर (१), गुलटेकडी, पुणे श्री.विनायक कोकरे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१९.५.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१६.६.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२७.७.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२५.८.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

सहकारी गृहरचना संस्थेने सभासदांबरोबर भाडेपट्टा करार करण्याबाबत अपीलकर्ता श्री.उदय सदशिवराव कुलकर्णी यांनी खुलासेवजा विचारणा केली असल्यामुळे माहिती दिली नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर(१), पुणे श्री.विनायक कोकरे यांनी केले.

अपीलकर्त्याने प्रश्नार्थक स्वरूपात माहिती मागितली असली तरी संदर्भित भाडेपट्टा कराराबाबत नियम / अधिनियम याबाबतची माहिती संबंधित नियमावलीच्या छायांकित प्रतीसह दिली गेली पाहिजे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील मान्य करण्यात येत आहे.

(२) अपीलकर्त्यास मूळ अर्जानुसार संबंधित नियमावलीची छायांकित प्रत जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर(१), पुणे यांनी त्वरित व निःशुल्क पुरवावी.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
29 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.जे.डी.गायकवाड
अशोकानगर, बी टाईप को-ऑप.हौ.सो.लि.,
बायपास रोड, खराडी, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर अभियंता, विकास योजना कार्यालय
(बांधकाम विभाग), पुणे महानगरपालिका, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता, विकास योजना कार्यालय
(बांधकाम विभाग), पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५१७ /२००९/ पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२७.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर अभियंता, विकास योजना कार्यालय
(बांधकाम विभाग), पुणे महानगरपालिका, पुणे श्री.राजेंद्र राऊत

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता, विकास योजना कार्यालय
(बांधकाम विभाग), पुणे महानगरपालिका, पुणे श्री.राजेंद्र मेदनकर

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.४.५२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२२.६.२००९ |

| | | |
|---|---|---|
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१०.८.२००९ |
| ६ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.जे.डी.गायकवाड यांनी मागितलेली सर्व माहिती अभिलेख अवलोकनासाठी उपलब्ध करून देण्यात आली. अभिहस्तांतरण दस्त(Conveyance Deed), पाणीपुरवठा आदीच्या संदर्भातील कार्यवाही विकसकाने पूर्ण न केल्याचा विषय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. अभिलेखानुसार अजूनही काही माहिती हवी असल्यास देण्याची तयारी असल्याचे अपीलकर्त्यासही कळविले आहे, असे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, विकास योजना कार्यालय(बांधकाम विभाग), पुण महानगरपालिका, पुणे श्री.राजेंद्र मेदनकर यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले. त्यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे

29 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. सुधीर काका कुलकर्णी
सप्तश्रृंग फ्लॅट नं.३, पहिला मजला,
प्लॉट नं.५, स.नं.२०/३/५/६, रोहितनगर,
बावधन खुर्द, पुणे-२१

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
सेनापती बापट रोड, पुणे-१६

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता,**
औंध उपविभाग, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
पुणे-७

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५२/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीचा दिनांक | दि. १७/०४/२०१० |
| ३ | **उपस्थिती**<br>श्री. सुधीर काका कुलकर्णी<br>रोहितनगर, बावधन खुर्द, पुणे-२१<br>**अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, सेनापती बापट रोड, पुणे-१६<br>श्री. मधुकर आत्माराम भोकरे<br>**जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता,**<br>औंध उपविभाग, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, पुणे-७<br>श्री. गजानन गोटीराम घाटोळे | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १७/०८/२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. निरंक |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २३/११/२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १६/०४/२०१० |
| ८ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** मौजे बालेवाडी येथील मोझे कॉलेजला केलेल्या विद्युत पुरवठयाचे रोहित्र सर्व्हे नं.२४/४ ब या जागेत बसविण्यात आल्या संदर्भात एकूण ४ मुद्दे | |

## विवेचन

'माहिती मिळाली तक्रार नाही', असे अपीलकर्ता श्री. सुधीर काका कुलकर्णी यांनी आयोगासमोरील दि.१७/०४/२०१० च्या सुनावणीच्या वेळी लेखी नमूद केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 20 APR 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सुनिलकुमार बावधनकर
चोपडे एजन्सीज ॲण्ड कन्सल्टसी,
हिरामण लांडे बिल्डिंग, मुंबई - पुणे रोड,
कासारवाडी, पुणे - ३४ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** जिल्हा उपनिबंधक,
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे -५ **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** सहायक जिल्हा उपनिबंधक,
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे -५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५२३/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२३.०३.२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br>**अपिलीय प्राधिकारी तथा** जिल्हा उपनिबंधक, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे -५ **डॉ.के.एन.जाधव यांचेमार्फत** प्रतिनिधी श्री.आनंद कटके<br>**जन माहिती अधिकारी तथा** सहायक जिल्हा उपनिबंधक, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे -५ श्री.आनंद कटके | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२०.१०.२००७ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२५.१०.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.०१.११.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.०६.१२.२००७ |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

जन माहिती अधिकाऱ्यांनी वेळेत माहिती न देता अपूर्ण पत्रव्यवहार करुन माहिती देण्याची टाळाटाळ केली. त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करुन माहिती व दंडाची रक्कम आपल्याला मिळावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.सुनिलकुमार बावधनकर यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केली आहे.

श्री.बावधनकर यांच्या दि.२०.१०.२००७ च्या अर्जाला दि.२५.१०.२००७ रोजी उत्तर दिले. दि.०६.११.२००७ रोजी त्यांनी केलेले अपील फेटाळल्याचा निर्णय अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे श्री.सुनील देशमुख यांनी दि.०६.१२.२००७ च्या आदेशान्वये सुनावणीनंतर दिला, असे जन माहिती अधिकारी तथा सहायक जिल्हा उपनिबंधक, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे -५ श्री.आनंद कटके यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पहाता जन माहिती अधिकारी तथा सहायक जिल्हा उपनिबंधक, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे -५ श्री.आनंद कटके व अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे श्री.सुनील देशमुख यांनी योग्य कार्यवाही केली आहे. दंडाची रक्कम अपीलकर्त्यास देण्याची तरतूद कायद्यात नाही, याची जाणीव अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

स्थळ : पुणे
दि. 28 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.व्ही.एम.मोरे
४७७, नाना पेठ, पुणे — अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहसंचालक,
उच्च शिक्षण संचालनालय, १७, आंबेडकर रोड, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रभारी प्राचार्य, सेंट विन्सेंट वाणिज्य,
रात्र महाविद्यालय, सेंट विन्सेंट रस्ता, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५२७ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२४.२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.व्ही.एम.मोरे
४७७, नाना पेठ, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहसंचालक, उच्च शिक्षण संचालनालय,
१७, आंबेडकर रोड, पुणे डॉ.एन.एम.कडू

| | | |
|---|---|---|
| **जन माहिती अधिकारी** तथा प्रभारी प्राचार्य, सेंट विन्सेंट वाणिज्य, रात्र महाविद्यालय, सेंट विन्सेंट रस्ता, पुणे श्री.एम.पी.परमार | | |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२४.९.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२०.१०.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२६.१०.२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२७.११.२००७ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२१.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.२४.२.२०१० रोजी घेण्यात आली.

आपल्या नेमणुकीला शिक्षण सहसंचालकांनी मान्यता दिली असूनही सन २००५ चा पगार मिळाला नाही. थकबाकीसाठी आपण अर्ज केला असूनही माहिती दिली जात नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.व्ही.एम.मोरे यांनी केली.

अपीलकर्त्यास विहित मुदतीत माहिती देण्यात आली आहे. शिक्षण सहसंचालकांची त्यांच्या नेमणुकीला मान्यता दिली असल्याचे ते म्हणत असले, तरी अशी मान्यता आपल्याकडे आलेली नाही व ती देण्याचा अधिकारही त्यांना नाही, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा प्रभारी प्राचार्य, सेंट विन्सेंट वाणिज्य रात्र महाविद्यालय, सेंट विन्सेंट रस्ता, पुणे श्री.एम.पी.परमार यांनी पूरक कागदपत्रांसह केले. माहिती देण्याबाबतचा आदेश आपण अपिलाच्या निर्णयात दिला होता. श्री.मोरे यांचा विषय वेतन निश्चितीबाबतचा असून ही बाब न्यायप्रविष्ट आहे. ही बाब माहितीचा

अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. जन माहिती अधिकारी तथा प्रभारी प्राचार्य, सेंट विन्सेंट वाणिज्य रात्र महाविद्यालय, सेंट विन्सेंट रस्ता, पुणे यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२९.४.२०१०